मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 11 जुलै 2025 | पान- 1

# हिंजवडीच्या वाहतूक समस्येवर कायमस्वरूपी तोडगा

## आमदार शंकर जगताप यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांकडून तातडीचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, अपुरी पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील समन्वयाचा अभाव यामुळे हजारो आयटी कर्मचारी आणि रहिवाशांचे जीवन त्रस्त झाले आहे. या गंभीर समस्यांकडे विधानसभेत लक्ष वेधत आमदार शंकर जगताप यांनी ठोस उपाययोजनांची मागणी केली. त्यांच्या मागणीनंतरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१० जुलै) मुंबईत उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत वाहतूक, मेट्रो, रस्ते आणि पायाभूत सुविधांबाबत अनेक निर्णायक निर्णय घेण्यात आले.



**३० मीटर पर्यायी रस्त्यासाठी आमदार जगताप यांचा आग्रह**

आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत सविस्तर भूमिका मांडत सूर्य हॉस्पिटलपासून वाकडमार्गे हिंजवडी फेज ३ पर्यंत PMRDA हद्दीतून ३० मीटर रुंदीचा पर्यायी रस्ता आरक्षित करून विकसित करण्याची मागणी केली.

"या रस्त्यामुळे सध्याच्या मुख्य मार्गावरील ५० टक्क्यांहून अधिक वाहतूक डायव्हर्ट करता येईल आणि कोंडीचा कायमस्वरूपी प्रश्न सुटेल," असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत, PMRDA आणि पिंपरी चिंचवड महापालिका यांना रस्ता आरक्षित करून लवकरात लवकर विकसित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

**नवीन मेट्रो मार्ग व रस्ते योजनांसाठी पुढाकार**

बैठकीत निगडी मुकाई चौक–वाकड–नाशिक फाटा–चाकण या मार्गासाठी नवीन मेट्रोचा DPR मंजूर करण्याची मागणीही आमदार शंकर जगताप यांनी केली. त्यावरही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, हा प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी पुढे पाठवण्याचे आदेश दिले.

**आमदार शंकर जगताप यांचा पुढाकार ठरतोय निर्णायक**

हिंजवडीसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आयटी हबसाठी भक्कम रस्ते, सार्वजनिक वाहतूक व नियोजन महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेऊन आमदार शंकर जगताप यांनी थेट मुख्यमंत्री स्तरावर प्रश्न उपस्थित करत प्रशासन हलवले. त्यांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतरच ही बैठक आयोजित झाली आणि निर्णयाच्या दिशेने वाटचाल झाली.

### सिंगल पॉईंट ॲथॉरिटीची घोषणा

- हिंजवडीमधील अनेक शासकीय विभागांच्या समन्वयाअभावी होणारा विकास रखडत असल्याने आमदार शंकर जगताप यांनी एकवटलेल्या नियंत्रण यंत्रणेची गरज अधोरेखित केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी 'सिंगल पॉईंट ॲथॉरिटी' स्थापन करून सर्व विकासकामे एकाच छताखाली आणण्याची घोषणा केली.

### मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला स्पष्ट आदेश

- सिंगल पॉईंट ॲथॉरिटीद्वारे सर्व समन्वय
- ३० मीटर पर्यायी रस्ता विकसित करणे
- डिसेंबर २०२५ पर्यंत हिंजवडी मेट्रो मार्ग सुरू करणे
- लक्ष्मी चौक पूल सहापदरी करणे
- पार्किंग व वाहतूक नियंत्रणासाठी तांत्रिक उपाय
- पुनावळे, ताथवडे, भूमकर चौक अंडरपासचे काम सुरू करणे

# पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचा शनिवारी चिंचवड येथे अभिष्टचिंतन सोहळा

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त येत्या शनिवारी (१२) अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी उपस्थित राहणार आहेत. याबाबतची माहिती डॉ.सुनिल भंडगे, ॲड सतिश गोरडे, रवी नामदे यांनी दिली.

चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात शनिवारी सकाळी साडे दहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्याला पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे, पद्मश्री रमेश पतंगे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल उपस्थित राहणार आहेत.



गेल्या अनेक वर्षांपासून गिरीश प्रभुणे पिंपरी-चिंचवड शहरातील समाजकार्यात कार्यरत आहेत. क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे ते अध्यक्ष आहेत. या अंतर्गत पुनरुत्थान समरसता गुरुकुलम चालविले जाते. या गुरुकुलममध्ये वंचित घटकांतील मुलांना शिक्षण दिले जात आहे. पारधी समाजासाठी ते काम करीत आहेत. या समाजातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी झटत आहेत. अशा प्रभुणे यांचा शनिवारी अमृतमहोत्सवी वाढदिवस आहे. या सोहळ्याला शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पुण्यातील गणेशोत्सवाबाबत मोठा निर्णय

## पारंपारिक वाद्यवादन करणाऱ्या पथकांवर खटले दाखल होणार नाहीत, सहपोलीस आयुक्तांची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

तरुणाईची मोठी संख्या पुण्यातील ढोल-ताशा पथकांमध्ये आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी पथके पाहिली. पण, पुण्यासारखी ढोल-ताशा पथके कुठेही नाहीत. पारंपरिक वाद्यांवर कोणत्याही प्रकारचे खटले नाहीत. तसे असतील तर ते नक्की थांबवू. यावर्षी पारंपरिक वाद्यांवर खटले होणार नाहीत, अशी ग्वाही पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली. 'गेल्या वर्षी लेझर लाईट बंद करण्यात आम्ही यशस्वी झालो. त्याप्रमाणे यावर्षी 'डीजे' चे करता आले तर प्रयत्न करुया, असेही त्यांनी स्पष्ट केले.



ढोल-ताशा महासंघ महाराष्ट्रतर्फे पुणे शहरातील ढोल-ताशा पथकांचा प्रातिनिधीक वाद्यपूजनाचा कार्यक्रम ग्रामदैवत कसबा गणपती मंदिरात झाला. त्याप्रसंगी शर्मा बोलत होते. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, कसबा गणपती मंदिराचे मुख्य विश्वस्त विनायक ठकार, महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, महासंघाचे ॲड. शिरीष थिटे, विलास शिगवण, अक्षय बलकवडे, अमर भालेराव, ओंकार कलढोणकर यांच्यासह शहरातील ढोल-ताशा पथकांचे प्रमुख आणि विविध गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

शर्मा म्हणाले, 'आपल्या पारंपरिक गोष्टी जागतिक स्तरावर जात आहेत. ढोल-ताशा देखील जागतिक स्तरावर पोहोचला असून पुण्यातील २७ हजार वादकांच्या शक्तीचा उपयोग उत्सवकाळात कसा करता येईल, हे देखील पाहू.'

> ढोल-ताशा पथकांचा सराव सुरू असतो तेव्हा रात्री दहानंतर पोलीस मुख्यालयात तक्रारींचे सर्वाधिक दूरध्वनी येतात. त्यामुळे सर्व पथकांनी आपला सराव लवकर सुरू करून रात्री दहापूर्वी बंद करणे गरजेचे आहे.
>
> **– रंजनकुमार शर्मा, पोलीस सहआयुक्त.**

रावले म्हणाले, 'ढोल-ताशा पथकातील वादकांचा वादन करताना आजूबाजूच्या लोकांना त्रास व्हावा, हा उद्देश नसतो. पुण्याच्या गणेशोत्सवात पोलिसांचे काम अवघड आहे, असे मी वरिष्ठांकडून ऐकले आहे. मात्र, आपल्या सर्वांच्या सहकार्याने कोणतीही अडचण न येता, हा उत्सव आपण साजरा करु. याकरिता लवकरच बैठक घेऊ.'

सूर्यवंशी म्हणाले, 'ढोल-ताशा वादनाने सर्वांमध्ये चैतन्य निर्माण होते. मर्यादेपेक्षा आवाज वाढल्याने खटले भरले जातात. मात्र, जी मर्यादा आहे, तेवढा आवाज निर्मिती करणारे वाद्य निर्मिती केल्यास कार्यकर्त्यांवर खटले होणार नाहीत. उत्सवकाळात शहराच्या पूर्व भागात कमी प्रमाणात गर्दी होते. त्यासाठी पूर्व भागात ढोल-ताशा वादन, रंगावली प्रदर्शन असे उपक्रम व्हायला हवेत.'

ठाकूर म्हणाले, 'अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा अशा अनेक ठिकाणी पुण्याची ढोल-ताशा संस्कृती पोहोचली आहे. महाराष्ट्राची ढोल ताशा ही ओळख आहे. उत्सव डीजे मुक्त उत्सव करण्यासाठी सर्वांचा सहभाग गरजेचा आहे. पथकांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची बरची पथक, टिपरी, घुंगुरकाठी पथक सहभागी करुन घ्यायला हवे. त्यामुळे मुलांना देखील आनंद घेता येईल. गणेशोत्सव हा दहा दिवसांचा उत्सव आहे, केवळ शेवटच्या दिवसापुरता तो मर्यादित राहता कामा नये.'

# आयटी अभियंत्याची दुर्मीळ विकारावर मात!

## शस्त्रक्रियेनंतर महिला पूर्णपणे बरी; 6 महिन्यांच्या दुखण्यानंतर पुन्हा कामावर जाण्यास सज्ज

**पुणे | प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील अभियंता असलेल्या एका महिलेला दुर्मीळ विकार झाला. तिच्या मणक्यात गाठ निर्माण झाल्याने तीव्र पाठदुखी सुरू झाली. दैनंदिन कामे करणेही तिच्यासाठी अवघड बनले. ती सहा महिन्यांपासून या विकाराने त्रस्त होती. अखेर डॉक्टरांनी लॅमिनेक्टोमी ॲन्ड डीकॉम्प्रेशन ऑफ कॉर्ड या प्रक्रियेद्वारे तिच्या मणक्यातील गाठ काढण्यात यश मिळवले. यामुळे ती आता दैनंदिन जीवन व्यवस्थितपणे जगू शकत आहे.



या महिलेला पाठीतील वेदना एखादे काम केल्यानंतर नव्हे तर रात्री झोपेत किंवा कोणत्याही वेळी सुरू व्हायची. त्यांनी काही ठिकाणी औषधे व फिजिओथेरपीद्वारे उपचार घेतले परंतु, वेदना कमी झाल्या नाहीत. अखेर त्यांची लक्षणे लक्षात घेऊन मणक्याची एमआरआय तपासणी करण्यात आली. त्यामध्ये पाठीच्या कण्याच्या मध्यभागी गाठ असल्याचे आढळून आले. याला टेराटोमा ऑफ कॉर्ड ॲट डी९ लेव्हल असे म्हणतात.

याबाबत नोबल हॉस्पिटल्स ॲन्ड रिसर्च सेंटरमधील डॉ.विशाल चौधरी म्हणाले की, या दुर्मीळ विकाराचे निदान वेळेवर न झाल्यास पायातील ताकद कमी होऊ शकते आणि मणक्याचे कायमचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आम्ही लॅमिनेक्टोमी ॲन्ड डीकॉम्प्रेशन ऑफ कॉर्ड प्रक्रिया करायचे ठरवले असे लॅमिनेक्टोमी प्रक्रियेमध्ये पाठीच्या कण्यावर किंवा नसांवर येणारा दाब कमी करण्यासाठी कशेरूकाच्या हाडाचा एक भाग काढून टाकण्यात येतो. या प्रक्रियेदरम्यान कुठल्याही नसांवर कोणत्याही प्रकारचा दाब पडतोय का किंवा काही परिणाम होत आहे का यासाठी सातत्याने न्युरो मॉनिटरींग सिस्टिमचा वापर करण्यात येतो. सुमारे साडेचार तासांच्या शस्त्रक्रियेनंतर गाठ काढण्यात यश आले.

### नेमका विकार काय?

» पाठीच्या कण्यात निर्माण झालेल्या टेराटोमा ऑफ कॉर्ड ॲट डी९ लेव्हल हा जंतूपेशींपासून निर्माण होणारा एक दुर्मीळ विकार आहे. यात सामान्यत: पाठीच्या कण्यातील किंवा आजूबाजूच्या उतींमध्ये गाठ निर्माण होते. या विकाराचे निदान सहसा एमआरआय किंवा हिस्टोलॉजिकल म्हणजेच पेशींची मायक्रोस्कोपिक तपासणी याद्वारे केली जाते. उपचारांमध्ये बहुतांशवेळा गाठ काढून टाकण्यासाठी आणि पाठीचा कण्यावरील दाब काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया केली जाते.

महिलेच्या शरीरातील गाठ ही कर्करोगग्रस्त नसल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. मात्र एकाच ठिकाणी स्थित आणि वाढत असल्याचे निदान झाले.अशा प्रकारची शस्त्रक्रिया गुंतागुंतीची असते आणि शस्त्रक्रियेनंतर पायातील ताकद जाणे किंवा मूत्राशयातील संवेदना कमी होणे अशी जोखीम असू शकते. या शस्त्रक्रियेनंतर आता ही महिला पूर्णपणे बरी असून घरची दैनंदिन कामे करीत आहे. ती आता कार्यालयीन काम करण्यासह सज्ज झाली आहे, असे चौधरी यांनी नमूद केले.

# महापालिकेकडून नागरिकांवर दंडात्मक कारवाई

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता व विद्रुप करणा-या नागरिकांवर महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून कारवाईचा बडगा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता व विद्रुप करणा-या नागरिकांवर महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील ७ हजार २१४ व्यक्ती, काही व्यावसायिक आस्थापना मालकावर दंडात्मक कारवाई केली. वर्षभरात तब्बल १ कोटी ४८ लाख ७०० रुपये दंड वसूल केला आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सहभागी झाली आहे. शहर स्वच्छतेबाबत इंदौर पॅटर्न राबविला जात आहे. त्यासाठी कचरा कुंडी मुक्त शहर संकल्पना राबविली आहे.

शहरातील १८ मीटर पुढील रस्त्यांची साफसफाई यंत्राद्वारे केली जात आहेत. घरोघरचा कचरा संकलनाचे काम ठेकेदारांमार्फत सुरू आहे. ओला, सुका, प्लॅस्टिक, घातक, बायोवेस्ट अशा पाच प्रकारे वर्गीकरण केलेला कचराच स्वीकारला जात आहे. नागरिकांच्या जनजागृतीसाठी करोडो रुपये खर्च केले जात आहेत. शिवाय कचरा स्थलांतरणासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर केंद्र सुरू केले आहेत.




### शहर स्वच्छतेसाठी नागरिकांची साथ हवी

» शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महापालिका प्रयत्न करत असताना नागरिकांची साथ महत्वाची आहे. मात्र, शहरातील विविध भागातील नागरिक नियम मोडण्यात अग्रेसर असल्याचे दिसून येत आहे. ओला आणि सुका कचरा एकत्र देणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे, थुंकणे, उघड्यावर शौचालयास जाणे, सार्वजनिक मालमत्तेचे विद्पीकरण करणे, व्यावसायिक आस्थापनामार्फत कचरापेटी न ठेवणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणे, डासोत्पत्ती स्थानाची निर्मिती करणे, रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे, जैव वैद्यकीय घनकचरा रस्त्यावर टाकणे, सार्वजनिक सभा, समारंभ सपल्यावर स्वच्छता न करणे अशा विविध नियमांचे उल्लंघन करणा-यांना महापालिकेच्या वतीने 300 रूपयांपासून 35 हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येत आहे.

शहरातील बेशिस्त नागरिक रस्त्यावर कचरा फेकत आहेत. त्यांच्यावर महापालिकेकडून दंडात्मक कारवाई सुरु केली आहे. शहरात सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका व शौच करणे, राडारोडा, कचरा टाकणे, कचरा रस्त्यावर जाळणे, डास उत्पती ठिकाणांकडे दुर्लक्ष करणे, कचऱ्याचे वर्गीकरण न करणे, जाहिरातींची भित्तिपत्रके लावणे, बायोमेडिकल वेस्ट रस्त्यावर टाकणे, बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर करणे अशा शहर अस्वच्छ करणाऱ्यांवर महापालिकेकडून दंड वसूल करण्यातयेत आहे.

### स्वच्छ सर्वेक्षणात सुधारणा की घसरण?

» शहर स्वच्छता आणि जनजागृतीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने दरवर्षी कोट्यवधी रूपये खर्च करण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात शहराने सहभाग घेतला आहे. गतवर्षी स्वच्छ सर्वेक्षणात शहराचा देशात 13 वा आणि राज्यात तिसरा क्रमांक आला होता. त्यामुळे यंदा यामध्ये सुधारणा की घसरण होणार १७ जुलैला जाहीर होणा-या निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

> "नागरिकांनी उघड्यावर कचरा, राडारोडा टाकू नये. लघुशंका करू नये. घरोघरचा कचरा पाच प्रकारात वर्गीकरण करून गोळा होत आहे. ओला, सुका, घातक, प्लॅस्टिक व बायोमेडिकल अशाप्रकारे वर्गीकरण करून त्याची विल्हेवाट लावली जात आहे. नागरिकांनी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी स्वत:हून पुढाकार घ्यावा. नागरिकांना स्वच्छतेची सवय लागावी म्हणून शहरात अस्वच्छता व विद्रूप करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे."
>
> \- सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, महानगरपालिका.

# शहरातील खड्डे बुजविण्यास अपयश; शहर अभियंत्याकडून आठ कनिष्ठ अभियंत्यांना नोटीस

## शहरातील खड्डे तसेच असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनचालकांची गैरसोय होत आहे. मे महिन्यापासून शहरातील खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. मात्र, शहरातील खड्डे तसेच असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनचालकांची गैरसोय होत आहे. मे महिन्यापासून शहरातील खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. मात्र, शहरातील खड्डे तसेच असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून खड्डे बुजविण्याची जबाबदारी असलेल्या आठ कनिष्ठ अभियंत्यांना नोटीसीचा दणका दिला आहे.

शहर व उपनगरांमधील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. शहरात पाणीपुरवठा, विद्युत, ड्रेनेज, स्थापत्य, शहरी दळणवळण, स्मार्ट सिटी, इतर काही विभागांकडून तसेच, महामेट्रोकडून रस्ते व पदपथ खोदाई सुरूच आहे. त्यात जोरदार पाऊस झाल्याने शहरात रस्त्यांवर सर्वत्र खड्डे दिसून येत आहेत. मात्र, पावसाने विश्रांती दिल्यानंतरही महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून खड्डे दुरूस्तीची मोहिम युद्धपातळीवर राबविली जात नाही. काही मोजक्याच रस्त्यांवर दुरूस्ती काम केले जात आहे. त्यामुळे अनेक रस्त्यांवरील खड्डे कायम आहेत. खड्डयांत लावलेले पेव्हिंग ब्लॉक वेगळे पडून खड्डे होत आहेत.

स्मार्ट सिटीकडून रस्त्यांवर लावलेली दगडे तुटून खड्डे तयार होत आहेत. ड्रेनेजलाईन व इतर कामांसाठी खोदलेल्या रस्त्यांवर पुन्हा खड्डे पडत आहेत. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून तळे निर्माण होत आहे. तसेच, खडी व माती रस्त्यांच्या कडेला साचल्याने वाहने घसरून अपघात होत आहेत.




खड्डे बुजविण्यास महापालिका प्रशासनाला अपयश आले असून जबाबदार असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महापालिकेच्या आठ कनिष्ठ अभियंत्यांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच खड्डे का बुजवले नाहीत. बुजवलेले खड्डयांची काही दिवसांतच नादुरुस्ती का झाली? याबाबत तीन दिवसांत लेखी खुलासा मागवण्यात आला आहे.

> शहरातील खड्डे बुजवण्याचे काम सुरू आहे. ज्या कनिष्ठ अभियंत्यांनी कामामध्ये कसूर केला आहे. त्यांना नोटीस देण्यात आली आहे. तीन दिवसांमध्ये लेखी खुलासा मागवण्यात आला आहे. समाधानकारक खुलासा नसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे..
>
> \- मकरंद निकम, शहर अभियंता. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# पुणे जिल्ह्यातील धरणे 74 टक्के भरली

## भीमा उपखोऱ्यातील तेरा धरणांतून पाणी नदीपात्रात सोडण्यास सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर गेल्या दोन महिन्यातील पर्जन्यवृष्टीमुळे भीमा नदीच्या उपखो-यांतील मध्यम आणि मोठ्या 26 धरण प्रकल्पामध्ये एकूण 74 टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्यावर्षी नऊ जुलैला या सर्व धरणांत केवळ 14 टक्के पाणीसाठा होता. म्हणजे जवळपास पाचपट पाणीसाठा झाला आहे.

पावसाळ्यातील जुलै आणि ऑगस्ट या महिन्यांतील पाऊस अद्याप पडायाचा असल्याने, यंदा अनेक ठिकाणी पूर येण्याची शक्यता आहे. धरणांत पाणी अडविण्यासाठी जागा असावी, म्हणून 26 पैकी 13 धरणांतून नदीपात्रात पाणी सोडण्यास सुरवात झाली आहे.

भीमा उपखो-यातील धरणे मुख्यत्वे पुणे जिल्ह्यात आहेत. राज्यातील सर्वांत मोठ्या उजनी धरणाची भिंत जरी सोलापूर जिल्ह्यात असली, तरी त्याचे जलाशय पुणे जिल्ह्यात आहे.



### खडकवासल्यातून पाच टीएमसी पाणी सोडले

पुणे जिल्ह्यात मुठा खोरे, नीरा खोरे, कुकडी खोरे आहे. त्या व्यतिरिक्त भीमा आणि इंद्रायणी नदीवर धरणे आहेत. मुठा खो?यातील खडकवासला प्रकल्पातील चार धरणांत 20 टीएमसी (68 टक्के) पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून गेले तीन आठवडे मुठा नदीत पाणी सोडण्यात येत आहे. या काळात खडकवासला धरण दोनवेळा भरेल एवढे म्हणजे 4.84 टीएमसी पाणी नदीत सोडण्यात आले आहे.

नीरा खोऱ्यातील चार धरणात ही 70 टक्के पाणीसाठा झाला आहे तेथील वीर धरणातून सोडण्यात येत असलेले पाणी थेट नीर नरसिंगपूर मार्गे पंढरपूरकडे जाते.कुकडी खोऱ्यातील धरणे पावसाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात भरतात. त्यातील एकूण सात धरणात 54 टक्के पाणीसाठा झाला आहे. मात्र घोड धरण 94% भरल्यामुळे त्यातून अडीच हजार क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. उजनी धरणाच्या जलाशयात जाते.

जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर गेल्या दोन महिन्यातील पर्जन्यवृष्टीमुळे भीमा नदीच्या उपखो-यांतील मध्यम आणि मोठ्या 26 धरण प्रकल्पामध्ये एकूण 74 टक्के पाणीसाठा झाला आहे.

### उजनीत 90 टक्के पाणीसाठा

उजनी धरण गेल्या वर्षी 9 जुलै रोजी शून्य पातळीच्या खाली उणे 38 टक्के होते. उजनी धरणात 90% पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे उजनीतून 14 हजार क्युसेक्स पाणी नदी आणि कालव्यात सोडण्यात येत आहे.

### पवना धरणात 76 टक्के जलसाठा

पिंपरी चिंचवडला पाणीपुरवठा करणारे पवना धरण 76 टक्के भरले आहे. त्यातून 2300 क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. भीमा नदीवरील चासकमान धरण ही 80% भरल्याने त्यातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. भामासखेड 59% तर आंद्रा धरण 95 टक्के भरले आहे.

### कृष्णा उपखोऱ्यातील धरणेही 70 टक्के

कृष्णा उपखोऱ्यातील तेरा धरणे सांगली सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यात आहेत. या धरणातही एकूण 70 टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी तो 30 टक्के होता येथील 13 पैकी 11 धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात येत आहे कोयना धरण 50 टक्के भरले आहे.

---

# उत्तर पुणे जिल्ह्यातील महसुली कामांना गती द्यावी

## खासदार मेधा कुलकर्णी यांची जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

उत्तर पुणे जिल्ह्यात महसूलविषयक असणाऱ्या कामांना गती द्यावी. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून लाभार्थी योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मेळावे घ्यावेत, अशी सूचना खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची खासदार मेधा कुलकर्णी यांनी भेट घेऊन उत्तर पुणे जिल्ह्यातील महसूलविषयक कामा संदर्भात चर्चा केली. यावेळी भाजपाचे जिल्हा सचिव प्रमोद बाणखेले, माजी तालुकाध्यक्ष संदीप बाणखेले ,गणेश बाणखेले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या, खेड,आंबेगाव,जुन्नर तालुक्याच्या आदिवासी डोंगरी भागातील विविध समस्या महसुलीविषयक असून त्या जलद गतीने त्याचा निपटारा होण्यासाठी कार्यवाही झाली पाहिजे, केंद्र आणि राज्य सरकारच्या मोठ्या प्रमाणात लोक कल्याणकारी योजना असून त्याचा लाभ थेट वाड्या-वस्त्यावरील आदिवासी बांधवांसह सर्वांना मिळाला पाहिजे.

यासाठी विविध गावांनी योजना संदर्भात शासनाच्या योजना संदर्भात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती मेळावे घेतले पाहिजे. त्यासाठी प्रांताधिकारी,तहसीलदार यांना सूचना करावी. अशी मागणी ही मेधा कुलकर्णी यांनी केले. यावेळी जिल्हा सचिव प्रमोद बाणखेले म्हणाले, केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना खूप चांगल्या आहे. परंतु त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी किंवा त्याची माहिती होण्यासाठी मेळावे घेतले पाहिजे. लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी किंवा त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यावेळी महसूलच्या विविध मागण्याचे निवेदन खासदार मेधा कुलकर्णी यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना दिल्याचे आंबेगाव तालुका भाजपचे माजी तालुका अध्यक्ष संदीप बाणखेले यांनी सांगितले.



### अधिकारी भेटत नसल्याच्या तक्रारी...

» संदीप बाणखेले म्हणाले, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना असल्या तरी त्याचा लाभ अनेकांना मिळत नाही. त्यामुळे अनेक जण खरे लाभार्थी या लाभांपासून वंचित असल्याचे त्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या निदर्शनास आणून देऊन ते म्हणाले, विशेषत: आंबेगाव तालुक्यातील महसूलविषयक नागरिकांच्या मोठ्या तक्रारी असून त्याची कार्यवाही झाली पाहिजे. अनेक वेळा तहसील कार्यालयात नागरिक त्यांची कामे घेऊन गेल्यास तेथे अधिकारी उपस्थित नसतात.त्यामुळे आदिवासी दुर्गम भागासह तालुक्याच्या पूर्व भागातून दूरवरुन आलेले नागरिकांना हेलपाटा बसतो. याबाबत योग्य ती सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करावी. अशी मागणी ही त्यांनी केली.